*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

***NAVJYOT / Vol. XII / Issue - II*** ***ISSN 2277- 8063***

# अवंतिकाबाई गोखले यांचे स्वातंत्र्य लढ्यातील कार्य एक अभ्यास

**डॉ. उर्मिला क्षीरसागर**, इतिहास विभाग, श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय,सांगली,
kshirsagarurmila@yahoo.co.in

---

**प्रस्तावना-**

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाचा इतिहास म्हणजे एक रोमांचकारी इतिहास आहे. ब्रिटिशांच्या प्रदीर्घ गुलामगिरीला झुगारून 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत देशाने स्वातंत्र्य मिळविले, मात्र यासाठी कित्येकांनी रक्त सांडले, तुरुंगवास पत्करला. लाखो स्त्री-पुरुषांनी जीवाचे पर्वा न करता या स्वातंत्र्यसंग्रामात झोकून दिल्यामुळे स्वातंत्र्य मिळणे शक्य झाले. स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाबद्दल फारच कमी संदर्भ दिसतात. साधनांच्या पुराव्यांच्या अभावी सर्वसामान्य स्त्रियांच्या सहभागाचे स्वरूप अदृश्यच आहे. ज्या कर्तृत्वात स्त्रियांनी विशेषता गांधीयुगात स्वातंत्र्य लढ्यात आपला खारीचा वाटा उचलला त्यात कस्तुरबा गांधी, मणीबेन नानावटी, सरोजिनी नायडू, स्वरूपा राणी, कमला नेहरू, कमला वेन पटेल, रामेश्वरी नेहरू, उषा मेहता मनीबेन पटेल, यांच्याबरोबरच अवंतिकाबाई गोखले यांनीही सहभाग घेतला होता असे दिसते. गांधीजींनी स्त्री शक्ती स्वातंत्र्यासाठी आवश्यक मानली, कारण त्यांच्या अनोख्या लढासाठी सहनशक्ती ही सर्वात मोठी योग्यता होती ,ती भारतीय स्त्रियांमध्ये खच्चून भरलेली आहे, असहकार सविनय कायदेभंग इत्यादी चळवळीत स्त्रियांचा सहभाग दिसून येतो .स्त्रियांनी केवळ राजकीय दृष्टिकोनातून देशाचा विचार न करता सामाजिक बांधिलकीची जबाबदारी स्वीकारून स्वकृत्व व स्वबळावर संस्था व संघटना याची उभारणी केली ,अशाच कर्तुत्वान व स्वातंत्र्यातील कार्यकर्त्या म्हणजे अवंतिकाबाई गोखले होय.

**शोधनिबंधाचा हेतू-**

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासात महात्मा गांधींची पहिली भारतीय पट्ट शिष्या म्हणून अवंतिकाबाई गोखले ओळखल्या जातात. त्यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील कार्याचा आढावा घेणे या उद्देशाने हा शोधनिबंध लिहिला आहे.

**कार्याची पार्श्वभूमी-**

हिंद महिला समाजाची स्थापना करण्याचा मुंबई पालिकेच्या पहिल्या महिला सदस्या तसेच स्थायी व आरोग्य समिती सदस्य सत्याग्रहीच्या तेराव्या तुकडीचे नेतृत्व करणाऱ्या व मिठाच्या सत्याग्रहात एकमेव महाराष्ट्र महिला म्हणून सहभाग घेतलेल्या, उत्तम परिचारिकेचे कार्य करणाऱ्या व महात्मा गांधींचे पहिले मराठी चरित्र लिहिणाऱ्या लेखिका इंग्रजीवर प्रभुत्व असलेल्या अवंतिकाबाई गोखले यांची केवळ महाराष्ट्रातच नाही तर भारताबाहेरही ख्याती होती अवंतिका वहिनींचा जन्म इंदूर येथे 17 सप्टेंबर 1882 रोजी श्री विष्णुपंत जोशी यांच्या मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचा विवाह नवव्या वर्षी बबनराव गोखले यांच्याशी झाला. जोशी घराणे सुशिक्षित सुधारणावादी असल्याने निरक्षर अवंतिका बाईंची शिक्षणाला सुरुवात झाली. विलायतेतून बबनरावांनी 300 हून अधिक पुस्तके अवंतिका बाईंना पाठविली. शिवाय सासऱ्यांनी त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी मदत केली.[1]

अवंतिकाबाईनी परिचारिकेचा व सुईनीचा अभ्यासक्रम 1901 साली पूर्ण करून त्यात प्रथम क्रमांक मिळविला. त्यांच्या शिक्षणाला नवे वळण देणारा हा प्रवास तत्कालीन स्थितीत किती महत्त्वाचा व क्रांतिकारी होता हे आजच्या स्त्रीवर्गाने समजून घ्यायला हवे. 1903 साली महाराष्ट्रात देवीची साथ आली, हा देवी रोग परमेश्वरी कोपा मुळे होतो, ही अंधश्रद्धा समाजात पसरली होती .तेव्हा त्यांनी हा रोग देवी कोपाचा नसून लसीकरण अभावी होतो हे पटवून समाजात आरोग्य विषयक जागृती केली. स्वतः रुग्णांची सेवा केली. त्यांच्या कार्यातून

समाजाप्रती असणारी त्यांची तळमळ दिसून येते. देश सेवा आणि त्यातूनही समाजसेवा यांचे मूल्य ठरविता येत नाही, हे तरुण पिढीस मार्गदर्शकच आहे [2] .

काडीपेटी तयार करण्याच्या कारखान्यात पतीचा हाताचा तळवा गमवावा लागल्यावर अवंतिका बाईनी पतीची सेवा केली. कारखान्याचे व्यवस्थापनही उत्कृष्टरित्या पाहिले. यावेळी सयाजीराव गायकवाड यांनी गौरव उद्गार काढले होते की, जर भारतीय स्त्रिया अशा तऱ्हेने नवऱ्याबरोबर कामे करतील तर अल्पकाळातच भारत स्वावलंबी होईल, आणि परक्यांच्या चौकोनातून मुक्त होईल.[3]

**स्वातंत्र्य लढ्यातील योगदान -**

1916 नंतर त्यांच्या कार्याचा व्याप वाढला. चंपारण्य सत्याग्रहातील कामगिरीने त्यांचे जीवनच बदलले.स्वातंत्र्य इतकीच सामाजिक सुधारणा गांधीजींना आवश्यक वाटत होती .सर्व सुधारणात चळवळी एकाच वेळी पुढे चालल्या पाहिजेत, असे मत असणाऱ्या गांधींची ही लखनऊ अधिवेशनात अवंतिकाबाईंची भेट झाली. त्यावेळी बिहार मधील चंपारण्य भागात निळीची लागवड व शेतकऱ्यावर होणारा अन्याय यावर चर्चा झाली अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी गांधीजींना महाराष्ट्र निवडक कार्यकर्ते शोधले, त्यात गोखले तापत्य होते महाराष्ट्राच्या सत्याग्रही तुकडीत अवंतिकाबाई आणि आनंदी वैश्य पायन दोन महिला होत्या .अवंतिकाबाईनी अज्ञान, निरक्षरता व आरोग्याची हेळसांड या विरुद्ध लढा पुकारला. बिहारमध्ये सर्वत्र दौरे काढून महिलांना आरोग्याचे महत्त्व सांगितले. स्त्री शिक्षणाचा प्रसार केला. स्वदेशाबद्दल प्रेम निर्माण करण्याचे विविध मार्ग स्वीकारले. स्वच्छता, प्रशिक्षण लोकजागृती केली. या काळात टिळकांचे प्रस्तावना असलेले महात्मा गांधी विषयीचे चरित्र अवंतिका बाईंनी लिहिले 1919 मध्ये नाशिक सभेत टिळका समोर अतिशय अस्कलित इंग्रजी भाषण केल्याने टिळक म्हणाले होते, महाराष्ट्राची सरोजिनी आता तयार झाली.[4]

गांधीजींच्या अहिंसात्मक व सविनय लड्याच्या तत्त्वज्ञानाने सर्वजण भारावून गेले होते म्हणूनच ज्यावेळी गांधीजींनी सविनय कायदेभंगाची हाक दिली त्यावेळी मिठाच्या सत्याग्रहात अवंतिका बाई सर्वांच्या पुढे होत्या.[5] प्रभात फेऱ्या, दारू, परदेशी कापडाच्या दुकानासमोर निदर्शने करणे, यामध्ये त्यांनी उत्साहाने भाग घेतला. पोलिसांनी मारहाण केलेल्या रुग्णांची सेवा करण्याचे काम त्यांनी केले. त्यांच्या कार्यामुळे त्यांची सर्वत्र प्रशंसा झाली. त्या स्वातंत्र्यलढ्याचा एक अविभाज्य अंग बनल्या. ब्रिटिशांची बंदी झुगारून त्यांनी आझाद मैदानावर ध्वजारोहण केले आणि सत्याग्रहीच्या तेराव्या तुकडीचे नेतृत्वही त्यांनी केले, ब्रिटिशांविरोधी दंड थोपटले, त्यामुळे इंग्रजांनी त्यांना सहा महिन्याची कैद व चारशे रुपयांचा दंड आकारला होता .[6]

अवंतिकाबाईना सक्रिय राजकारणात करण्यात बंदी केली, तेव्हा हिंद महिला समाजामार्फत विधायक कार्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. त्यांनी हिंद महिला समाजाचे अध्यक्षपद सांभाळीत सूत कताईचे वर्ग चालवणे, व्याख्याने कीर्तने, प्रवचने, भजने याद्वारे लोक जागृती केली. त्याचा परिणाम होऊन स्त्रिया स्वतःहून असहकार, सत्याग्रह आंदोलनात सहभागी होत होत्या. 1942 च्या चले जावं चळवळीवेळी त्यांना कर्करोगांनी ग्रासल्याने सहभागी होता आले नाही, त्यावेळी स्वातंत्र्यानंतर लगेचच महात्मा गांधींची हत्या झाल्याने तो आघात त्यांना सहन न झाल्याने अवघ्या सव्वा वर्षात 26 मार्च 1949 रोजी मुंबई येथे त्यांचे निधन झाले.[7]

**समारोप-**

भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासात महात्मा गांधीजींची पहिली भारतीय पट्ट शिष्य म्हणून अवंतिकाबाई गोखले ओळखल्या जातात अवंतिका बाईंनीही राजकीय व सामाजिक अशा दोन्ही अंगाने केलेले कार्य राष्ट्रीय जडणघडणीमध्ये मोलाचे असल्याचे दिसून येते. कष्टाळू प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अवंतिका बाईंना पतीची साथ मिळालेली शिक्षणाच्या माध्यमातून समाजसेवेची नवी दृष्टी त्यांना लाभली. समाज व्यवस्थेत मूलभूत बदल करण्याची त्यांना गरज वाटत होती. महात्मा गांधींच्या व्यक्तिमत्त्वामुळे समाजाच्या सर्व थरातून वाढता पाठिंबा मिळत होता, अशावेळी अवंतिका बाईनी आपले कर्तुत्व व नेतृत्व सिद्ध केले. महात्मा गांधींनी ही

त्यांच्यातील गुणवैशिष्ट्ये ओळखली आणि त्यातून एक ध्येयनिष्ठ कर्तृत्व संपन्न, धडाडीचे दूरदृष्टी असणारे नेतृत्व निर्माण झाले. त्यांचे संघटन कौशल्य उत्तम होते. कोणत्याही संकटाचा सामना न घाबरता धिरोदत्त पणे करण्याची वृत्ती, काळानुसार बदल करत सतत नवीन तंत्रज्ञान व कौशल्य समजावून घेण्याची वृत्ती, राष्ट्रीय एकात्मतेसाठी सातत्याने धडपड विधायक काम करण्याची वृत्ती, अशा अनेक गुणांचा समन्वय त्यांच्या ठिकाणी दिसून येतो.[8] भारत स्वातंत्र्यलढ्यात एक स्वातंत्र्य सेनानी म्हणून परिचित असणाऱ्या अवंतिकाबाई गोखले यांचे कार्य म्हणजे आजच्या काळातील तरुण पिढीस मार्गदर्शक असेच आहे. अशा कर्तृत्व संपन्न स्त्रियांमुळेच भारतीय स्वातंत्र्यलढा हा जगात प्रभावीपणे उठून दिसतो. पुढे भविष्यात वर्षांनुवर्षं तो प्रेरणादायी समजावून घेण्याची वृत्ती राष्ट्रीय एकात्मतेसाठी सातत्याने धडपड विधायक काम करण्याची वृत्ती अशा अनेक गुणांचा समन्वय त्यांच्या ठिकाणी दिसून येतो भारत स्वतंत्र्यलढ्यात एक स्वातंत्र्य सेनानी म्हणून परिचित असणाऱ्या अवंतिकाबाई गोखले यांचे कार्य म्हणजे आजच्या काळातील तरुण पिढीस मार्गदर्शक असेच आहे अशा कर्तृत्व संपन्न स्त्रियांमुळेच भारतीय स्वातंत्र्यलढा हा जगात प्रभावीपणे उठून दिसतो. पुढे भविष्यात वर्षांनुवर्षं तो प्रेरणादायी ठरणार आहे.

**संदर्भ-**

1 डॉक्टर उपाध्याय जे.सी.आधुनिक भारताचा इतिहास, लक्ष्मीनारायण प्रकाशन, आग्रा, 2001,पृष्ठ 149

2 मार्डीकर मदन ,आधुनिक भारताचा इतिहास, कैलास प्रकाशन, औरंगाबाद , 2008, पृष्ठ क्रमांक 35

3 मोदी नवाज,(संपादक), फडके वासंती,( अनुवादक) भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रिया, मेहता प्रकाशन, पुणे 2003, पृष्ठ क्रमांक 157

4 गव्हाणकर रोहिणी, गांधीजींच्या घट्ट शिष्य अवंतिकाबाई गोखले, लोकसत्ता,चतुरंग पुरवणी, 3 ऑगस्ट 2013 ,पृष्ठ क्रमांक 1

5 कटारे अनिल ,भारतीय चळवळीचा इतिहास, एज्युकेशनल प्रकाशन, औरंगाबाद 2013,पृष्ठ क्रमांक 329

6 बोर्डे खडसे सुनिता, खडसे संतोष, ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया, शुभम प्रकाशन, 2010, पृष्ठ क्रमांक 126

7 शिखरे द. ना.(संपादक) महात्मा गांधी, संकलित वांडमय ,खंड 13, (जानेवारी 1915- 1917) संचालक प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र विभाग मुंबई ,पृष्ठ क्रमांक 599

8 फडके य.दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र ,खंड चार, श्री विद्या प्रकाशन पुणे, 1993, पृष्ठ क्रमांक 59